## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या शनिवार दि. ३० जुलै २०११ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १४१ वी बैठक शनिवार दि.३० जुलै २०११ रोजी सकाळी ११.०० वा.गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | **मा. श्री. सुभाष हजारे** | **उप सभापती तथा मुख्य अधिकारी** |
| २) | **मा.श्री.कमरुद्दीन मर्चंट** | **सदस्य** |
| ३) | **मा. श्री. किसन बा. जाधव** | **सदस्य** |
| ४) | **मा. श्रीमती सुरेखा पाटील** | **सदस्या** |
| ५) | **मा.श्री.व्ही.जी.नायर** | **सदस्य** |
| ६) | **मा.श्री. नंदकुमार काळे** | **सदस्य** |
| ७) | **मा.श्री.तारिक फारुकी** | **सदस्य** |
| ८) | **उपकर निर्धारक व संकलक, म.न.पा.** | **निमंत्रक** |
| ९) | **कार्यकारी अभियंता इमारत प्रस्ताव,म.न.पा.** | **निमंत्रक** |
| १०) | **डॉ.श्री.रमेश सुरवाडे** | **सहमुख्य अधिकारी** |
| ११) | **श्री.महिषी,निवासी कार्यकारी अभियंता** | **सचिव** |

बैठकीच्या सुरुवातीस सचिव श्री.महिषी यांनी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या १४१ व्या बैठकीत सर्व उपस्थित सन्मा.सदस्यांचे हार्दिक स्वागत करुन सर्व सन्मा.सदस्यांना विषयसूची पाठविली असल्याचे सांगून मा. उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

**बाब क्रमांक - १४१.१**

**विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दि.५.०७.२०११ रोजी झालेल्या १४० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.**

-------------

मागील बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते ४१ वर सादर करण्यांत आले आहे.

बैठकीच्या सुरुवातीस मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांनी मंडळात नव्याने रुजू झालेले सहमुख्य अधिकारी श्री. रमेश सुरवाडे यांचेशी ओळख करुन दिली तसेच

उपमुख्य अधिकारी म्हणून श्रीमती सीमा टकले यांचेकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यांत आल्याचे सांगितले, तद्नंतर बैठकीस सुरुवात करण्यांत आली.

सन्मा सदस्य श्री. किसन जाधव यांनी बैठकीच्या सुरुवातीस असे निदर्शनास आणले की मागील बैठकी सन्मा.सदस्य श्री.बशीर पटेल व इतर सदस्यांनी एफएसआय २.५ बाबत काही शंका उपस्थित केल्या तसेच त्यांनी मा.अध्यक्ष यांना असे विचारले की, यापुढे सर्व २.५ वरुन ३.०० एफएसआय देण्याचे एनओसीचे प्रस्ताव शासनाकडे पाठविणे बंधनकारक आहे का.

यावर मा.मुख्य अधिकारी यांनी स्पष्ट केले की, मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण ) व प्रधान सचिव (गृहनिर्माण ) यांचेशी याबाबत चर्चा झालेली असून मार्च २००९ नंतर निर्गमीत केलेल्या ना हरकत प्रमाणपत्रांची यादी या अनुषंगाने शासनास सादर केली आहे. त्यावर शासनस्तरावर निर्णय अपेक्षित आहे. तथापि शासन निर्णयामधील तरतुदीनुसार सद्यस्थितीत शासनाकडून तशी मंजूरी घेणे अपेक्षित आहे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी ज्या ३३ प्रकरणांवर म्हाडा देय क्षेत्र खुल्या बाजारात विकलेले आहे. त्याप्रकरणी कार्यकारी अभियंता यांनी पोलिस स्टेशनमध्ये जावून एफ.आय.आर. नोंदविणे आवश्यक आहेत. याबाबत मागील बैठकीत ठरले होते, त्याबाबत आतापर्यंत झालेल्या कार्यवाहीबाबत सर्व सन्मा सदस्यांना खुलासा करण्याबाबत विनंती केली.

यावर मा.मुख्य अधिकारी, दु.व पु. मंडळ यांनी असे स्पष्ट केले की, सर्व प्रकरणे एक सारखी असल्यामुळे एकत्र गुन्हा नोंदविण्याचे ठरले होते व त्याप्रमाणे आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाने तक्रार नोंदवूनही घेतली होती, तथापि आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाकडे प्रत्येक प्रकरणी स्वतंत्र तक्रार नोंदविण्याचा त्यांचे स्तरावर आता निर्णय झाला आहे. त्याप्रकरणी संबंधित कार्यकारी अभियंत्याने प्रत्येक प्रकरणाबाबत वेगवेगळी तक्रार त्यांचेकडे नोंदविण्याची आहे. प्रत्येक प्रकरणाबाबत वेगवेगळा गुन्हा नोंदवून त्यावर कार्यवाही करण्यांत येणार आहे. तश्या प्रकारचा सूचना सर्व विभागीय उपमुख्य अभियंता व कार्यकारी अभियंता यांना दिलेल्या असून, त्याप्रमाणे कार्यवाही सुरु असल्याचे स्पष्ट केले.

सन्मा सदस्य श्री.किसन जाधव यांनी डी.एस.आर.सुधारणेबाबत पुढे काय कार्यवाही झाली याची चौकशी केली.

श्री.महिषी, सचिव यानी सदर प्रकरणी मा.मुख्य अभियंता-१/प्राधिकरण यांचेस्तरावर डी.एस.आर.सुधारित करणेबाबत बैठक घेण्यात आली असून, त्याचे म्हणने असे आहे की, प्रत्येक बाबींचे दर विश्लेषण करुन पीडब्ल्यूडी प्रमाणे अदयावत डी.एस.आर.तयार करणेबाबत मा.मुख्य अभियंता-१/प्रा. यांनी दिलेल्या सुचनेनुसार कार्यवाही सुरु असून

त्यांनी सर्व उपमुख्य अभियंता- परिमंडळ- १,२,३ व ४ / मुं.इ.दु.व पु.मंडळ यांना काही बाबीवाटून त्यांचे दरामध्ये सुधारण्या करण्याबाबत आदेश दिलेले असून त्यामध्ये सुधारणा/बदल करण्यांत येत आहे.

यावर मा.मुख्य अधिकारी/ मुं.इ.दु.व पु.मं. यांनी स्पष्ट केले की, हा विषय मागील बैठकीतसुध्दा चर्चेला गेला होता, त्यामुळे फक्त कार्यवाही सुरु आहे, असे उत्तर अपेक्षित नसून झालेल्या कार्यवाहीबाबत खुलासा करावा.

यावर उपमुख्य अभियंता श्री.सेठ यांनी स्पष्ट केले की, मा.मुख्य अभियंता-१ / प्राधिकरण यांचेकडून प्राप्त झालेल्या यादीप्रमाणे मंडळातंर्गत कार्यवाही सुरु असून, आमच्या अखत्यारित असलेल्या कार्यकारी अभियंताकडून याबाबत कार्यवाही करण्यांत येत आहे, त्याबाबत अजून १० ते १५ दिवसाचा कालावधी लागण्याची शक्यता आहे.

मा.मुख्य अधिकारी/ मुं.इ.दु.व पु.मं. यांनी यावर असे सांगितले की, ही सर्व कार्यवाही या महिन्यात पूर्ण करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीत ठेवण्यांत यावा व मा.मुख्य अभियंता-१/प्राधिकरण यांना पुढील बैठकीत येण्याची विनंती करण्यात यावी म्हणजे याविषयी चर्चा करुन, त्यावर निर्णय घेणे सोईस्कर होईल व सर्व सन्मा.सदस्यांच्या शंकाचेही निरासन होईल.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी व्हॅकेशन नोटीसचा नमुना फारच चांगल्याप्रकारे बनविल्याचे सांगितले पुढे त्यांनी असे सुचविले की, अशाच प्रकारे आपल्या वितरण पत्रातही ब-याच त्रुटी आहेत. त्यामध्येही बदल होणे गरजेचे आहे. त्यामुळे व्हॅकेशन नोटीसप्रमाणे वितरण पत्राचाही नमुन्यामध्ये फेरबदल करुन नवीन नमुना तयार करण्यात यावा असे मागील बैठकीत सांगितले होते त्याबाबत झालेल्या कार्यवाहीबाबत आम्हाला अवगत करावे, अशी विनंती केली.

मा.मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, याबाबतच्या कार्यवाहीस थोडा अवधी लागण्याची शक्यता आहे, जसे कि व्हॅकेशन नोटीस नमुना बनविण्यासाठी काही कालावधी लागला, तसेच सुधारित वितरण पत्र नमुना बनविताना पूर्वीच्या वितरण पत्रामध्ये काय त्रुटी आहेत, त्याबाबत अभ्यास करुन सर्व संबंधित अधिकारांची बैठक घेवून त्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा करुन प्रस्तावावर विधी सल्लागार/प्राधिकरण यांचे अभिप्राय घेवून तद्नंतर मा.उपाध्यक्ष/प्रा यांची मंजूरी घेवून वितरणपत्र अंतिम करण्यांत यावे की भविष्यात त्याचा गैरवापर होणार नाही, प्रत्येक वितरण पत्रास अनु क्रमांक असावा जेणेकरुन त्यामध्ये गैरप्रकार होणार नाहीत व किती गाळयांचे वितरण झालेले आहे, याचा तपशिल त्वरित मिळू शकेल. चांगल्याप्रकारे वितरण पत्राचा नमुना बनविणेबाबत मा.मुख्य अधिकारी यांनी सहमुख्य अधिकारी व उपमुख्य अधिकारी/पुगा यांना निर्देश दिले. तसेच सदर बाबतीत श्री.शेठ,उपमुख्य अभियंता,परिमंडळ-२ यांचीही मदत घ्यावी असे सुचविले.

मा.मुख्य अधिकारी/ दु.व पु.मंडळ यांनी व्हॅकेशन नोटीसचा नमुना व प्रस्तावास मंडळाची मान्यता प्राप्त झालेली असून सदर विषयाची बाब टिप्पणी तयार करण्यांत येऊन ती प्राधिकरणाच्या बैठकीत मंजूरीस्तव सादर करण्यांत येईल. प्राधिकरणाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर नवीन व्हॅकेशन नोटीसचा नमुना वापरण्यात येईल, असे सांगितले.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सारस्वत बॅकेमार्फत जी भाडेवसुली होत आहे, त्यास प्रतिसाद चांगला मिळत असून त्यासाठी आपण भाडेकरु/रहिवाशांनी, जर तीन महिन्याचे भाडे एकदम भरल्यास त्यांना जी ३ टक्के सवलत द्यावयाची आहे, तो प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविण्यांत आलेला होता. सदर प्रस्तावास प्राधिकरणाची मंजूरी प्राप्त झालेली आहे का ? असे विचारले.

यावर श्री.तपासे, मुख्य लेखाधिकारी यांनी असे सांगितले की सदर प्रस्तावास मंजूरी मिळण्याकरिता बाब टिप्पणी तयार करण्यांत आलेली असून, अजून प्राधिकरणाची बैठक न झाल्यामुळे सदर प्रस्तावास मान्यता प्राप्त होणे प्रलंबित आहे.

सन्मा सदस्य श्री.किसन जाधव यांनी संक्रमण शिबिरात वर्षानुवर्ष रहात असलेल्या भाडेकरुंना बृहतसूचीवर घेण्याकरिता जी नियमावली बनविलेली आहे, त्याप्रमाणे पात्र व बृहतसूचीवर येण्यास इच्छुक असलेल्या रहिवाशांना रितसर बृहतसूचीवर घेण्याची प्रक्रिया जून महिन्यापासून सुरु करण्याबाबत मागील बैठकीत सूचना देण्यांत आल्या होत्या. तसेच हस्तांतर झालेल्या सदनिकेच्याबाबत सध्या राहणारा भाडेकरुंच्या नावांने मास्टर लिस्टचे गाळे वितरीत करणेबाबत कार्यवाही सुरु करण्यांत आलेली आहे का ? असे किती भाडेकरु आहेत, त्यांची स्वतंत्र यादी तयार करण्यांत आलेली आहे का, याबाबत विचारणा केली. ज्या भाडेकरु/रहिवाश्यांनी गाळा विकला असेल, अशा प्रकारच्या गाळयामध्ये रहात असलेल्या व्यक्तिकडून सर्व कागदपत्राची छाननी करुन, त्यांचेकडून फी आकारुन सदरची खोली त्यांचे नांवे करणेबाबत तसेच नंतर अशा प्रकारच्या भाडेकरु/रहिवाशांना मास्टर लिस्टमध्ये सामावून घेणेबाबत विचार होवून त्याबाबत धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंतीकेली

सन्मा सदस्य श्री.किसन जाधव यांनी मागील बैठकीत असा मुद्दा चर्चेला गेला होता की, एनओसी अंतर्गत प्राप्त होणा-या गाळयांचे वितरण मागील १५ वर्षात कशा प्रकारे झालेले आहे, याबाबतचा सर्वे मंडळातर्फे सुरु आहे, त्या अनुषंगाने झालेल्या कार्यवाहीबाबत सभागृहास अवगत करण्याची विनंती केली.

मा.मुख्य अधिकारी यांनी सर्व सन्मा सदस्यांच्या निदर्शनास आणून दिले की, बृहतसूचीवरुन वितरणासाठी, मंडळातर्फे ज्या इमारती पुनर्रचित करण्यांत आलेल्या आहेत त्यामध्ये किती मूळ गाळेधारक होते व त्यामध्ये किती ज्यादा गाळे होते याबाबत तसेच वि.नि.नि. ३३ (७) अंतर्गत ना हरकत प्रमाणपत्राच्या माध्यमातून प्राप्त गाळयांची

मंडळातर्फे तपासणी सुरु करण्यांत आलेली आहे. या सर्व प्रक्रियेस थोडा कालावधी लागणार आहे परंतु यानंतर मंडळास सर्व गाळयाबाबत सविस्तर माहिती उपलब्ध होवू शकेल. म्हणजे मंडळाकडे किती गाळे उपलब्ध होते व किती गाळे वितरण झाले, उपलब्ध झालेल्या अतिरिक्त गाळयांचे रितसर वितरण झालेले आहे का, तसेच एनओसी अंतर्गत प्राप्त होणा-या गाळयांचे वितरण मागील १५ वर्षात कशा प्रकारे झाले याबाबतची सर्व सविस्तर माहिती प्राप्त होवू शकेल व त्या अनुषंगाने पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यांत येईल. परंतु यासर्व प्रक्रियेस दोन ते तीन महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी मा.अध्यक्ष यांचे असे निदर्शनास आणून दिले की, मागील बैठकीमध्ये एक अभ्यास गट गठीत करण्यांत आलेला होता त्यामध्ये मंडळाचे सन्मा.सदस्य तसेच श्री.अर्गेकर,उपमुख्य अभियंता हे निमंत्रक होते, या अभ्यास गटाने एक अहवाल तयार केला होता. त्याची एक प्रत श्री.महिषी यांना दिल्याचेही निदर्शनास आणून दिले तो मंडळाच्या बैठकीमध्ये सादर करण्यासाठी देण्यांत आलेला होता, परंतु सदर अहवालाबाबत काय झाले सदर अहवाल आजपर्यंत मंडळाच्या बैठकीत का ठेवण्यांत आलेला नाही, याबद्दल खेद व्यक्त केला.

मा.मुख्य अधिकारी यांनी अभ्यास गटाने सादर केलेला अहवाल मंडळाच्या बैठकीत ठेवणेबाबत श्री. महिषी यांना विचारले असता, त्यांनी असे स्पष्टीकरण दिले की, अहवालात केलेले शिफारशीबाबत मुख्य अभियंता/ विधी सल्लागार/प्राधिकरण यांचे मत घेवून तद्नंतर सदर प्रस्ताव लवकरच मंडळाच्या बैठकीत ठेवण्यांत येईल नंतर शासनास सादर करणेबाबतची कार्यवाही करण्यांत येईल. ही बाब महत्वाची असल्यामुळे त्यासाठी सुमारे दोन महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावर मा.मुख्य अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, कार्यवाही सुरु आहे असे न सांगता , याबाबत आतापर्यंत जी काही कार्यवाही झालेली आहे ती सभागृहाच्या समोर आली पाहिजे याकरिता पुढील बैठकीत अभ्यास गटाने तयार केलेल्या अहवालीची प्रत सर्व उपमुख्य अभियंता,कार्यकारी अभियंता यांना देण्यांत येवून त्यामध्ये काही त्यांच्या सुधारणा असल्यास त्यांना सुचवाव्यात. तसेच पुढील बैठकीत मुख्य अभियंता यांना बैठकीत येणेबाबत विनंती करण्यांत यावी, जेणेकरुन अभ्यास गटाने सादर केलेल्या अहवालाबाबत सविस्तर चर्चा करता येईल.

यानंतर श्री.महिषी ,सचिव यांनी सांगितले की, अभ्यास गटाने तयार केलेल्या अहवालाची प्रत सर्व सन्मा.सदस्यांना व मंडळाच्या अधिका-यांना पाठविण्यांत येईल.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सभागृहाच्या असे निदर्शनास आणून दिले त्यांच्या विभागातील भटचाळ, ताडदेव या विभागातील इमारतीस सन २००३ साली

एनओसी देण्यांत आलेली असून त्या इमारतीची अत्यंत वाईटस्थिती असून विकासक त्याबाबत काहीही करीत नसल्याचे निर्दशनास आणून दिले.

श्री.शेठ, उपमुख्य अभियंता यांनी स्पष्ट केले की,याबाबत विकासक व रहिवाशी यांची एकत्रित सुनावणी घेण्यांत आलेली असून, त्यामध्ये मार्ग काढण्याचा प्रयत्न सुरु आहे. तसेच विकासक यांनी आवश्यक ती मदत व दुरुस्त्या करुन देण्याचे आश्वासन दिले आहे.त्याबाबत मंडळाच्यास्तरावर कार्यवाही सुरु आहे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सभागृहाच्या असे निदर्शनास आणून दिले सातआसरा ही इमारत पीएमजीपी प्रकल्पातर्फे बांधण्यात आलेली असून त्यामध्ये एका खोलीत स्लॅब कोसळून एका बाईच्या डोक्याला जखम झाल्याची बातमी दै. महाराष्ट्र टाईम्स वर्तमान पत्रात प्रसिध्द झाल्याचे निदर्शनास आणून दिले याबाबत मी पत्रही दिले होते तरी याबाबत मंडळातर्फे कोणती कार्यवाही झालेली आहे त्याची माहिती दयावी,

यावर मा.मुख्य अधिकारी/ मुं.इ.दु.व पु. मंडळ यांनी सर्व उपस्थित उपमुख्य अभियंता व कार्यकारी अभियंता यांना अशा सूचना केल्या की, सदर इमारत ही उपकर प्राप्त इमारत नसून ती मंडळाने पुनर्रचित केलेली इमारत आहे, त्याची दुरुस्ती मंडळानेच करणे आवश्यक आहे, त्यामुळे संबंधित अभियंत्यांनी याबाबत निर्णय घेवून जेथे आवश्यकता आहे तेथे दुरुस्ती करुन घेणे गरजेचे आहे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी उमरखाडी पीएमजीपीतर्फे बांधलेल्या ९ इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव शासनास पाठविणेबाबतची कार्यवाही मंडळातर्फे होत आहे, तशीच कार्यवाही इतरही इमारतींच्या बाबतीत व्हावी, अशी विनंती केली. तसेच त्यांनी पुढे श्री.शंकर पांर्टे सारख्या ब-याच व्यक्ती आज कित्येक वर्षे संक्रमण शिबिरात रहात असून , त्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने कार्यवाही होणे गरजेचे असल्याचे सांगितले, कारण अशाच प्रकारे ब-याच इमारती अनधिकृतपणे उभ्या आहेत व त्यामध्ये अनधिकृत लोक रहात आहे. मात्र मूळ भाडेकरु/रहिवाशी हे वर्षांवर्षे संक्रमण शिबिरात रहात असून, त्यांचा काही दोष नसतांना त्यांना न्याय मिळण्याच्या दृष्टीकोनातून कार्यवाही होणे गरजेचे आहे.

याबाबत मा.मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, याबाबत मंडळातर्फे मास्टर लिस्टबाबत जो सर्व्हे केला, त्याव्दारे सुमारे १०,००० अर्ज प्राप्त झालेले आहे, त्यावर कार्यवाही सुरु असून, त्यामध्ये इमारत अनधिकृतपणे बांधलेली आहे की, पुनर्रचित झालेली आहे का, हे तपासणे शक्य झाले असून त्यानुसार आतापर्यंत तीन इमारती अनधिकृतरित्या बांधलेल्या असल्याचे निदर्शनात आले असून त्याबाबत कार्यवाही सुरु असून अशा इमारतीतील मूळ रहिवाशी/भाडेकरुंचे पुनर्वसनाच्या अनुषंगाने सविस्तर प्रस्ताव प्राधिकरणासमोर निर्णयासाठी आणण्याचे अनुषंगाने बाब टिप्पणी तयार करण्यांचे

प्रस्तावित आहे, तसेच ही बाब धोरणात्मक असल्याने त्यास शासनाची मंजूरी घेणे आवश्यक आहे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी डी.विभागातील एक इमारतीची पहाणी करण्यांसाठी मागील आठवडयांत गेलो असता, संकल्पसिध्दी ही इमारत मोडकळीस आलेली असून, त्यामध्ये रहात असलेल्या भाडेकरु / रहिवाशानी तशा प्रकारचे पत्रही मंडळास दिलेले आहे. सदर इमारत आता दुरुस्तीच्या पलिकडे गेलेली असून, त्याची पुर्नबांधणी मंडळातर्फे करण्यांबाबत पत्र दिलेले आहे, अशा प्रकारच्या इमारती ज्या १९७० नंतरच्या १९९० पूर्वीच्या काही इमारती असून, त्यामध्ये १२०,१६५,१८० चौ.फूट क्षेत्रफळाचे गाळे आहेत जे अंत्यत वाईट अवस्थेत आहे, अशा इमारती कधीही कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच या इमारतीच्या देखभालीसाठी जास्त खर्च होवून, तेवढी वसूलीही होत नाही.मंडळाचे यामध्ये आर्थिक नुकसानच जास्त होते. नुकतेच एका इमारतीतील एका खोलीत स्लॅब कोसळून अपघात झालेला आहे, ही बातमी सर्व वर्तमान पत्रात प्रसिध्द झालेली आहे. माझी आपणांस विनंती आहे की, अशा सर्व इमारतीबाबत आपण धोरणात्मक निर्णय घेणे गरजेचे आहे.

यावर मा.मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, ज्या इमारती मंडळाने १९७० नंतर बांधलेल्या आहेत व ज्या इमारतीं आज वाईट स्थितीत ऊभ्या आहेत, त्यांचा देखभालीचा खर्चही दिवसे-दिवस वाढत आहे. त्यामुळे यापुढे ज्या इमारती दुरुस्ती पलिकडच्या आहेत , तसेच त्यांची दुरुस्ती करुन काहीच फायदा होणार नसेल, तसेच त्या इमारती धोकादायक असून, तेथे राहणा-या भाडेकरु/रहिवाशांच्या जिवितास धोका असेल अशा सर्व इमारती मग त्या पीएमजीपीच्या असतील किंवा इतर पुनर्रचित इमारती असतील अशा इमारतींचा पुनर्विकास मंडळातर्फे विकास नियंत्रण नियमावली ३३ (९) खाली शासन मान्यतेनंतर करता येवू शकेल.तथापी प्रकरण निहाय निर्णय अपेक्षित आहे.

याकरिता मा.मुख्य अधिकारी यांनी सर्व कार्यकारी अभियंता यांना सूचना केल्या की, वर नमूद केलेले मुद्दे विचारात घेवून अशा प्रकारच्या इमारतीबाबत तसेच ज्या भूखंडाचे क्षेत्रफळ ४००० मिटरपेक्षा जास्त असेल तर अशा इमारतींचा पुनर्विकास मंडळातर्फे करण्याचा प्रस्ताव तयार करुन सादर करावा, तद्नंतर त्यास शासनाची मंजूरी घेवून पुढील कार्यवाही करणेबाबत विचार करण्यांत येवू शकेल.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, १९१ - ताडदेव येथे एक इमारत असून तिचे बांधकाम पूर्ण झालेली आहे, तेथे अशी बाब निदर्शनास आलेली आहे की, त्या इमातीमध्ये मूळ भाडेकरु कमी होते परंतु विकासकांनी चुकीचे कागदपत्र सादर केलेले आहे व बांधकामही परवानगी प्रमाणे झाल्याचे निदर्शनात येत

नाही. तरी ही बाब तपासावी व त्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यांत यावी असे सुचविले. याबाबत त्यांनी संबंधित अधिका-यांना पत्रही दिल्याचे सांगितले.

मा.मुख्य अधिकारी/ मुं.इ.दु.व पु. मंडळ यांनी याबाबत संबंधित कार्यकारी अभियंता यांचेशी चर्चा केली व त्यांना अशी सूचना केली की,अशी एखादी तक्रार प्राप्त झाल्यावर तुम्ही प्रत्यक्ष जागेवर जावून पहाणी करणे, तेथे रहात असलेल्या सर्व भाडेकरु/रहिवाशांचे पुनर्वसन झालेले आहे किंवा नाही हे पहाणे तसेच मंडळास देय असलेल्या क्षेत्रफळाचे गाळे बांधलेले आहे की नाही यासर्व बाबींची खातरजमा करणे गरजेचे आहे.

सन्मा.सदस्य श्री.व्ही.जी.नायर यांनी मा.अध्यक्ष व सर्व सन्मानिय सदस्यांचा असे निदर्शनास आणून दिले की, मी मागील सहा महिन्यात मंडळाच्या विविध अधिका-यांना पत्रे लिहिलेली आहे, परंतु मला येथे असे खेदाने नमूद करावेसे वाटते की, माझा एकाही पत्राचे उत्तर मला आजतागायत देण्यांत आलेले नाही. ही बाब मागील बैठकीत उपस्थित केली होती. त्यामध्ये श्री.महिषी, निवासी कार्यकारी अभियंता यांना दि.१० मार्च २०११ यांना एक पत्र दिले होते त्यामध्ये मंडळातंर्गत विविध विषयाची माहिती विचारली होती, सन २००७ पासून २०११ पर्यंत किती गाळे होते व किती गाळे वितरीत केले, किती गाळे रिक्त आहेत याबाबतची यादी मागितली होती. याबद्दलची माहिती देणे अपेक्षित होते परंतु अद्यापही सदर माहिती मला देण्यांत आलेली नाही.

यावर मा.मुख्य अधिकारी/ दु.व पु. मंडळ यांनी याबाबत उपमुख्य अधिकारी /पुगा व मिळकत व्यवस्थापक (पुगा) यांनी सन्मा.सदस्य श्री.व्ही.जी.नायर यांनी उपस्थित केलेल्या वरील मुद्दाबाबत उत्तर देण्याचे पत्र तयार करुन दोन दिवसापूर्वी पाठविल्याचे सांगितले, बैठक संपल्यानंतर त्यांना पत्राची प्रत देण्यात येईल असेही सांगितले. तसेच त्यांनी इतर उपस्थित केलेले मुद्दे बैठकीत चर्चेले जाण्यासारखे नसून आपण वैयक्तिक निवासी कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात जावून आपल्या शंकाचे निरासरण करुन घ्यावे, तसेच आवश्यकता असल्यास मला भेटून, त्याबबात चर्चा करण्याचे आश्वासन दिले. तसेच सदरची माहिती उपमुख्य अधिकारी/पुगा , निवासी कार्यकारी अधिकारी व सहमुख्य अधिकारी यांचे अखत्यारित असल्यामुळे सदर माहिती त्यांना देणेबाबत त्यांनी संबंधित अधिका-यांना सूचना दिल्या.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी बैठकीच्या शेवटी असा मुद्दा उपस्थित केला की, ज्या इमारती मंडळातर्फे ३३ (९) खाली बांधलेल्या आहेत त्यांना ३३(७) प्रमाणे ॲसेसमेंन्ट टॅक्स कमी करता येणे शक्य आहे का अशाप्रकारे पूर्वी सवलत दिलेली आहे. हरीओम सोसायटीबाबतचा मुद्दा आहे, यासंबंधात २००६ साली महानगरपालिकेस पत्र लिहिलेले आहे.

यावर मुख्य अधिकारी/ मुं.इ.दु.व पु.मं. यांनी स्पष्ट केले की, ॲसेसमेंन्ट बाबत काही नियम ते आपण बनविलेले नसून त्यांनी बनविलेले आहेत, त्याबाबत कार्यकारी अभियंता हे पाहतील, तसेच याबाबत नियम पाहून पुढील कार्यवाही करणे शक्य होईल, यावर उपमुख्य अभियंता श्री.शेठ यांनी कार्यवाही चालू असल्याचे सांगितले, हरीओम या इमारतीबाबत कार्यवाही राहिली असेल, त्याबाबत महानगरपालिकेस पत्र लिहून कार्यवाही सुरु केलेली आहे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी म्हाडाने जमिन संपादन केलेल्या जागेवर एकत्रितपणे विकास करण्याचा प्रस्ताव होता, परंतु याबाबतची कार्यवाही होत नाही व बरेच वर्षे जमिन पडून राहते त्यानंतर सदर जमिनीवर अनधिकृत व्यक्ति आपले वास्तव्य करतात किंवा अनधिकृतपणे बांधकाम होवून इमारत ऊभी रहाण्याची शक्यता असते. तर असा प्रस्ताव आहे की, सदर जमिनीवर म्हाडाने विकास करावा असा प्रस्ताव मंडळातर्फे शासनास सादर करणेबाबत विनंती केली.

सन्मा.सदस्या.श्रीमती सुरेखा पाटील यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, दत्तप्रसाद रहिवाशी संघ, प्रभादेवी या इमारतीमधील रहिवाशांनी दि. ३०/११/२००९ रोजी पाण्याच्या टाकीस संरक्षण भिंत बांधणेबाबत पत्र दिले होते. तद्नंतर सदर कामास मागील मंडळाच्या बैठकीमध्ये मान्यता देण्यांत आलेली होती, ते काम राहून गेलेले आहे ते पूर्ण करुन दयावे, अशी त्यांनी मा.अध्यक्ष महोदयाना विनंती केली.

यावर मुख्य अधिकारी/ मुं.इ.दु.व पु.मं. यांनी उपमुख्य अभियंता यांना सूचना केली की, दत्तप्रसाद या इमारतीमधील गच्चीवरील पाण्याच्या टाकीस संरक्षण भिंत बांधण्याचे काम त्वरीत पूर्ण करणेबाबत कार्यवाही करावी.

**वरील सविस्तर चर्चेअंती कार्यवृत्तांत स्थायी करण्यात आले.**

**बाब क्रमांक - १४१-२ (१)**

**विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या विविध विभागातील प्रस्तावित दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रकांना प्रशासकिय मान्यता देण्याबाबत**

**१.परिमंडळ- १ मधील (अ,सी-१,सी-२ व सी-३) २५ इमारती.**

*********

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. **४३ ते ५३** वर सादर करण्यांत आलेला आहे.
सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १४१/ १२४५**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार २५ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु. ३,३८,८७,१६०/-(रुपये- तीन कोटी

अडतिस लक्ष सत्याऐंशी हजार एकशे साठ फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१,७४,२४,९३७/- (रुपये एक कोटी चौ-याहत्तर लक्ष चौविस हजार नऊशे सद्‌तिस फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १४१ -२ (२)**

विषय - २. **परिमंडळ-२ मधील (डी-१, डी-२, व ग-दक्षिण) १४ इमारती.**

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. **५५ ते ६३** वर सादर करण्यांत आलेला आहे.
सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १४१/१२४६**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण १४ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.२,१०,५७,१८९ /-(रुपये- एक कोटी दहा लक्ष सत्तावन्न हजार एकशे एकोनव्वद फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु. १,०८,९१,३०२ /- (रुपये एक कोटी आठ लक्ष एक्याण्णव हजार तिनशे दोन फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

----------o-----o-----------

**बाब क्रमांक - १४१. २ (३)**

विषय - **परिमंडळ-४ मधील ( ग-उत्तर,फ-उत्तर, फ-दक्षिण )
२१ इमारती.**

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.६५ ते ७७ वर सादर करण्यांत आलेला आहे.
सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १४१ /१२४७**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण २१ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.५,९१,०३,८२८ /-(रुपये- पाच कोटी एक्याण्णव लक्ष तिन हजार आठशे अठ्ठाविस फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु. ३,६१,६८,२४० /- (रुपये तिन कोटी एकसष्ट लक्ष अडसष्ट हजार दोनशे चाळीस फक्त ) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

----------o-----o-----------

**<u>बाब क्र.१४१.(३) शुध्दीपत्रक</u>**

विषय - १. **इमारत क्र.१३ आबाबाई काशीनाथ मार्ग या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामाच्या पहिल्या टप्प्यातील दुरुस्ती करीता अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यतेतील बदलाबाबत.**

-------------------------

उपरोक्त प्रस्ताव पृष्ट क्र.७९ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती उक्त प्रस्तावात होणा-या बदलाबाबत स्पष्टीकरण तसेच पूर्वी दिलेल्या मान्यतेच्या प्रतीही सादर केल्या नाहीत त्यामुळे सदर प्रस्ताव मागे घेण्यात यावा व पुढील बैठकीत नव्याने विषय सादर करावा असे सर्वानुमते ठरले.

--------------o-------o------------

बाब क्रमांक - १४१ (२)

विषय - २. **इमारत क्र.६, प्लॅनेट मिल लेन या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामाच्या सहाव्या टप्प्यातील दुरुस्ती करीता अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यतेतील बदलाबाबत.**

-----------

उपरोक्त प्रस्ताव पृष्ट क्र.८१ वर सादर करण्यात आला आहे.
सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**<u>ठराव क्रमांक -१४१/ १२४८</u>**

सविस्तर चर्चेअंती **इमारत क्र.६, प्लॅनेट मिल लेन** या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामाच्या सहाव्या टप्प्यातील दुरुस्ती करीता अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मंडळाच्या १४० व्या बैठकीत देण्यांत आली होती. प्रशासकीय मान्यता देताना प्रशासकीय मान्यतेची रक्कम रु.४,४७,५७४/- अशी दर्शविण्यांत आली होती. परंतु सदर प्रशासकीय मान्यतेची रक्कम रु.११,२७,१७०/- अशी पाहिजे होती. प्रशासकीय मान्यतेची रक्कम रु.४,४७,५७४/- ऐवजी रु. ११,२७,१७०/- अशी वाचण्यास व रक्कम रु.११,२७,१७०/- या रक्कमेस प्रशासकीय मंजूरी देण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

--------------o-------o------------

बाब क्रमांक - १४१ (३)

विषय - ३. **इमारत क्र.२९-एच, खोताचीवाडी (धोबी इमारत) या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामाच्या तिसऱ्या टप्प्यातील दुरुस्ती करीता अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यतेतील बदलाबाबत.**

-----------

उपरोक्त प्रस्ताव पृष्ट क्र.८३ वर सादर करण्यात आला आहे.
सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक -१४१/ १२४९**

सविस्तर चर्चेअंती **इमारत क्र.२९-एच, खोताचीवाडी (धोबी इमारत)** या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामाच्या सहाव्या टप्प्यातील दुरुस्ती करीता अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मंडळाच्या १३५ व्या बैठकीत देण्यांत आली. प्रशासकीय मान्यता देताना प्रशासकीय मान्यतेची रक्कम रु.२३,८६,३७०/- अशी दर्शविण्यांत आली होती. परंतु सदर प्रशासकीय मान्यतेची रक्कम रु.२३,९९,६७२ /- अशी पाहिजे होती. प्रशासकीय मान्यतेची रक्कम रु.२३,८६,३७०/- ऐवजी रु. २३,९९,६७२/- अशी वाचण्यास व रक्कम रु. २३,९९,६७२/- या रक्कमेस प्रशासकीय मंजूरी देण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १४१ -(७) पुनर्विकास**

विषय - **मुंबई बेटावरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.**

--------------o-------o------------

मुंबई बेटावरील अ वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासा करीता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे ९ प्रस्ताव पृष्ठ क्र. ८५ ते १२६ वर मंजूरीसाठी सादर करण्यांत आले आहेत. सदर प्रस्तावांवर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

१. भुकर पहाणी क्र.४३५, मांडवी विभाग, **इ.क्र.१२-ए,** व्ही.व्ही.चंदन स्ट्रीट, मुंबई-४००००३.

२. भुकर पहाणी क्र.८८१, भुलेश्वर विभाग, इ.क्र.१०२-१२०, शामलदास गांधी मार्ग, प्रिंसेस स्ट्रिट, मुंबई येथील '**अर्थ बाग**'.

३. भूकर पहाणी क्र.६७१, गिरगांव विभाग, इ.क्र.२६८-७९, एस.व्ही.पी.मार्ग, गिरगाव, डी विभाग मुंबई ४००००४ "**कपोल निवास**".

४. भुकर पहाणी क्र.८५, ताडदेव विभाग, इ.क्र.१६०-१६०सी, अलिभाई प्रेमजी मार्ग, ग्रँट रोड, मुंबई ४०० ००७ येथील "**तांबावाला बिल्डींग / बनकर बिल्डींग**".

५. भूकर पहाणी क्र.८६५, गिरगांव विभाग, इ.क्र.६८-७२, ३री क्रॉस गल्ली, खेतवाडी बॅक रोड, डी-विभाग, मुंबई-४ येथील "**रुपावाला बिल्डींग**".

६. भूकर पहाणी क्र.६३९(भाग), गिरगांव विभाग, इ.क्र.१६७-ई व १६७-एफ, नानुभाई देसाई रोड, गिरगांव, मुंबई-०४ येथील "**पी ॲन्ड आर ब्लॉक्स्**".

७. भुकर पहाणी क्र.१/७१६ पैकी, माझगाव विभाग, **इ.क्र. २८बी, ३०बी, ३२डी, ३२सी, ३४जी, ३६अे, ९बी, ३६ व २८-२८अे,** चुनीलाल मेहता कम्पाऊन्ड, डी.पी.वाडी, माझगांव, मुंबई.

८. भुकर पहाणी क्र.२/१८७६, भायखळा विभाग, ४ मोटलीबाई स्ट्रिट, आग्रीपाडा मुंबई येथील **'मे.चिस्तीया मंझील सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित'.**

९. भूकर पहाणी क्र.४३७/१०, माटुंगा विभाग, प्लॉट क्र.४९(उत्तर), दादर-माटुंगा इस्टेट, इमारत क्र.१४३६, सायन रोड, ब्राम्हणवाडा रोड, माटुंगा, मुंबई १९ येथील **''कृष्णकुंज''.**

<u>ठराव क्रमांक - १४१ / १२५०</u>

मुंबई बेटावरील अ वर्गातील खालील ०९ मालमत्तावरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्तावास नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली .

१. भुकर पहाणी क्र.४३५, मांडवी विभाग, **इ.क्र.९२-ए,** व्ही.व्ही.चंदन स्ट्रीट, मुंबई-४००००३.

२. भुकर पहाणी क्र.८८१, भुलेश्वर विभाग, इ.क्र.१०२-१२०, शामलदास गांधी मार्ग, प्रिंसेस स्ट्रिट, मुंबई येथील **'अर्थ बाग'.**

३. भूकर पहाणी क्र.६७१, गिरगांव विभाग, इ.क्र.२६८-७९, एस.व्ही.पी.मार्ग, गिरगाव, डी विभाग मुंबई ४००००४ **''कपोल निवास''.**

४. भुकर पहाणी क्र.८५, ताडदेव विभाग, इ.क्र.१६०-१६०सी, अलिभाई प्रेमजी मार्ग, ग्रँट रोड, मुंबई ४०० ००७ येथील **''तांबावाला बिल्डींग / बनकर बिल्डींग''.**

५. भूकर पहाणी क्र.८६५, गिरगांव विभाग, इ.क्र.६८-७२, ३री क्रॉस गल्ली, खेतवाडी बॅक रोड, डी-विभाग, मुंबई-४ येथील **''रुपावाला बिल्डींग''.**

६. भूकर पहाणी क्र.६३९(भाग), गिरगांव विभाग, इ.क्र.१६७-ई व १६७-एफ, नानुभाई देसाई रोड, गिरगांव, मुंबई-०४ येथील **''पी ॲन्ड आर ब्लॉक्स्''.**

७. भुकर पहाणी क्र.१/७१६ पैकी, माझगाव विभाग, **इ.क्र. २८बी, ३०बी, ३२डी, ३२सी, ३४जी, ३६अे, ९बी, ३६ व २८-२८अे,** चुनीलाल मेहता कम्पाऊन्ड, डी.पी.वाडी, माझगांव, मुंबई.

८. भुकर पहाणी क्र.२/१८७६, भायखळा विभाग, ४ मोटलीबाई स्ट्रिट, आग्रीपाडा मुंबई येथील **'मे.चिस्तीया मंझील सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित'.**

९. भूकर पहाणी क्र.४३७/१०, माटुंगा विभाग, प्लॉट क्र.४९(उत्तर), दादर-माटुंगा इस्टेट, इमारत क्र.१४३६, सायन रोड, ब्राम्हणवाडा रोड, माटुंगा, मुंबई १९ येथील **''कृष्णकुंज''.**

-------------------oo-------------------------

<u>बाब क्रमांक -१४१.२(४)</u>

विषय - **मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या विविध विभागातील प्रस्तावित दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.**

--------------------

**परिमंडळ-१** मधील (अे, सी-१व सी-२ ) १४ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. **१२७ ते १३६** वर सादर करण्यांत आले आहेत. सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १४१/ १२५१**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण १४ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.२,८३,२७,२७४ /-(रुपये- दोन कोटी त्रेऐंशी लक्ष सत्तावीस हजार दोनशे चौ-याहत्तर फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु. २,३१,५५,०२१/- (रुपये दोन कोटी एकतीस लक्ष पंचावन्न हजार एकविस फक्त ) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

----------------oo---------------

**बाब क्रमांक -१४१ २ (५)**

**विषय - परिमंडळ-३ मधील (बी-१, बी-२, ई-१ व ई-२) २७ इमारती.**

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. १३७ ते १४९ वर सादर करण्यांत आलेला आहे. सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

----------------oo---------------

**ठराव क्रमांक - १४१/ १२५२**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण २७ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.५,३४,१५,५६४ /-(रुपये- पाच कोटी चवतीस लक्ष पंधरा हजार पाचशे चवसष्ट फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु. ३,२८,५६,३९६/-- (रुपये तिन कोटी अठ्ठाविस लक्ष छप्पन्न हजार तिनशे श्याण्णव एकविस फक्त ) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक -१४१. (५)**

**विषय- इ.क्र.१०-१०के, कास मंझील, चमार लेन, मुंबई या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीबाबत ना हरकत प्रमाणपत्र परताव्यासह.**

----------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. १५१ वर सादर करण्यांत आलेला आहे.
सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १४१/१२५३**

सविस्तर चर्चेअंती **इ.क्र.१०-१०के, कास मंझील,** चमार लेन, मुंबई या इमारतीच्या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीचे दुस-या टप्प्याचे कामाचे अंदाजपत्रकास दि.२८/०१/२०११ रोजी मंडळाच्या १३५ व्या बैठकीत प्रशासकीय मान्यता रु.११,८१,५३२- या रकमेस प्रति चौ.मी. १७९०.८९/- या दराने काम मंडळामार्फत करण्यासाठी देण्यात आली होती. परंतु भाडेकरु/रहिवाशांनी सदरचे काम ना हरकत प्रमाणपत्र परताव्यासह करण्याकरिता प्रस्ताव दिल्यामुळे सदर काम मंडळामार्फत न करता ना हरकत प्रमाणपत्र परताव्यासह करण्याकरिता सवानुमते मंजूरी प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

---------------

**बाब क्रमांक -१४१. (६ )**

**विषय - भुकर पहाणी क्र.७६४ भायखळा विभाग, उपकर क्र. ई-५४९, ५६०-५४८(१), ५४६ आणि ई-५५२(१-२) इ.क्र.१६२ए, १६२बी, १३८-१५२ आणि १६०-१६६ एम.ए.रोड, मुंबई येथील कासममिया चाळ / कंदुरीचाळ / काथावाला चाळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.**

----------

**उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. १५३ ते १५६ वर सादर करण्यांत आलेला** आहे.
सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १४१/१२५४**

सविस्तर चर्चेअंत भुकर पहाणी क्र.७६४ भायखळा विभाग, उपकर क्र. ई-५४९, ५६०-५४८(१), ५४६ आणि ई-५५२(१-२) इ.क्र.१६२ए, १६२बी, १३८-१५२ आणि १६०-१६६ एम.ए.रोड, मुंबई येथील कासममिया चाळ / कंदुरीचाळ / काथावाला चाळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता २.५ किंवा मूळ भोगवटादारांच्या पुर्नवसनासाठी आवश्यक असलेला चटईक्षेत्र निर्देशांक यापैकी जो अधिकचा असेल असा चटई क्षेत्र निर्देशांक देण्याकरिता मंडळाच्या दि.२६/०४/२०११ रोजी झालेल्या १३८ व्या बैठकीमध्ये काही अटी व शर्तीसह ना हरकत प्रमाणपत्र देण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यांत आली होती. परंतु अट क्र,९ नुसार अर्जदाराने मूळ मालकाकडून मे.काथावाला रिऍल्टस एल.एल.पी.यांच्या नावांने नोंदणीकृत मुखत्यार पत्र ना हरकत प्रमाणपत्र देण्यापूर्वी सादर न केल्यामुळे ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यांत आले नव्हते. दरम्यानच्या काळात शासनाने दि.२१/५/२०११ रोजीच्या काढलेला अधिसूचनेनुसार अर्जदाराने मुखत्यार पत्र सादर करुन ३.०० चटईक्षेत्र निर्देशांक देण्याबाबत विनंती केली होती. त्यासअनुसरुन सादर केलेल्या ३.०० चटईक्षेत्र निर्देशांक देण्याच्या

प्रस्तावास सवानुमते मंजूरी प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक -१४१.(७)**

विषय - **इमारत क्र. १९०/१९२, एम. ए. रोड या म्हाड विनियम १९७६ मधील कलम ८८ (३) (अ) अंतर्गत दिलेले प्रमाणपत्र रद्द करुन सदर इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत.**

-----------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. **१५७ ते १५९** वर सादर करण्यांत आले आहेत. सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १४१/ १२५५**

सविस्तर चर्चेअंती इमारत क्र. १९०/१९२, एम. ए. रोड या म्हाड विनियम १९७६ मधील कलम ८८ (३) (अ) अंतर्गत दिलेले प्रमाणपत्र रद्द करुन इमारतीच्या मालकास दुरुस्तीकरिता विना परतावा ना हरकत प्रमाणपत्र देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

--------------o-------o------------

**मा.सभापती तथा मुख्य अधिकारी यांच्या परवानगीने आयत्यावेळचे विषय घेण्याचे ठरले**

**बाब क्रमांक -१४१.(८)**

विषय - **इमारत क्र. ४६६ मेहता बिल्डिंग, नाथालाल पारेख मार्ग, माटुंगा या इमारतीकरीता संरचनात्मक दुरुस्ती ना हरकत प्रमाणपत्राव्दारे ( परताव्यासह) करणेसाठी प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. उपकर क्रमांक फऊ- ७७५९ (२), वर्ग-अ**

-----o----o----

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. **१६१ ते १६३** वर सादर करण्यांत आले आहेत. सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १४१/ १२५६**

**सविस्तर चर्चेअंती इमारत क्र. ४६६ मेहता बिल्डिंग, नाथालाल पारेख मार्ग, माटुंगा या इमारतीकरीता संरचनात्मक दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास रक्कम रु. ३७,०१,४८०/- या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली व सदरचे काम ना हरकत प्रमाणपत्राव्दारे (परताव्यासह) करण्याकरिता सर्वानुमते मान्यता देण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.**

बैठकीच्या अखेरीस मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांनी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर केले.-

सचिव तथा निवासी कार्यकारी अभियंता
मुं.इ.दु.व पु.मंडळ.

सहमुख्य अधिकारी,
मुं.इ. दु.व पु.मंडळ

मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी,
मुं.इ. दु.व पु.मंडळ